आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

# ओबीसी आणि भटक्या-विमुक्तांच्या आरक्षणाच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका ;

## पुरोगामी महाराष्ट्राला काळीमा फासणारी घटना - हरिभाऊ राठोड

नुकतेच मुंबई उच्च न्यायालयामध्ये मराठा समाजाचे नेते बाळासाहेब सराटे यांनी ओबीसी आणि भटक्या-विमुक्तांच्या आरक्षणाला आव्हान देऊन, सदर आरक्षण घटनाबाह्य आहे, आणि अवाजवी आहे, ते रद्द करावे अशी याचिका मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल केली आहे. गेली कित्येक वर्ष स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ओबीसी आणि भटक्या-विमुक्तांना संविधानामध्ये असलेल्या तरतुदींचा अभ्यास करून वंचित आणि दुर्बल घटकांना सामाजिक न्याय देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण आणि वसंतरावजी नाईक यांनी ओबीसींना १० टक्के तर भटक्या-विमुक्तांना ४ टक्के आरक्षण नोकरी आणि शिक्षणामध्ये दिले. तद् नंतर १९९४ साली राज्यात मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करताना २७ टक्के आरक्षण ओबीसींना वाढून देऊन त्यामध्ये भटक्या विमुक्त, धनगर,वंजारी यांनाही यथोचित आरक्षण दिले गेले. परंतु मराठा समाजाचे नेते बाळासाहेब सराटे यांनी या आरक्षणाला आव्हान देऊन, एका प्रकारे महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाला काळीमा फासण्याची कृती केलेली आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या या राज्यामध्ये ज्या ठिकाणी सामाजिक न्याय आणि समता, स्वतंत्रता आणि बंधुता याची मुहूर्तमेढ रोवली गेली, त्या राज्यात न शोभणारी ही बाब आहे.

**ओबीसी आणि भटक्या विमुक्तांच्या आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले, यात याचिकाकर्त्यांचे काय म्हणणे आहे ते बघुया...**

**<u>या याचिकेत मध्ये म्हटले आहे की.......</u>**

**" राज्य सरकारने इतर मागासवर्गीय प्रवर्गात (ओबीसी ) राज्यघटनेने घालून दिलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाने अनेक निवाड्यामध्ये कायम केलेल्या कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करताच, अनेक जाती-पोटजातींचा समावेश करून घटना बाह्य कृती केली आहे. त्याचबरोबर ओबीसींची एकूण लोकसंख्या लक्षात न घेताच अवाजवी पद्धतीने तब्बल 32 टक्क्यापर्यंत आरक्षण देण्यात आले आहे. असा दावा जनहित याचिकादारांनी याचिकेत केला आहे.**

**सामाजिक न्यायाचे तत्त्व अवलंबून जात मुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी जातनिहाय आरक्षणाऐवजी आर्थिक निकषावर आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय १९५९ मध्ये घेतला होता.**



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458. 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाझा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१. टेली - 07232-256333, 256010

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९



**मागासलेपण हे प्रामुख्याने गरिबीमुळे असते, असे निरीक्षण नोंदवून सर्वोच्च न्यायालयानेही महाराष्ट्राच्या या निर्णयाची वाखाणणी केली होती. मात्र नंतर सरकारी सेवांमध्ये मागास प्रवर्गा अंतर्गत, नोकरभरती आणि अन्य मुद्द्याविषयी बी.डी. देशमुख समिती स्थापन करण्यात आली. या समितीने सरकारी सेवांमध्ये आरक्षण देण्यासाठी केवळ जात हा आधार म्हणून विचारात घेण्याची शिफारस केली. तसेच आरक्षणाच्या टक्केवारीसाठी राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय लोकसंख्या विचारात घेण्याची शिफारस केली. परंतु या समितीने सामाजिक व आर्थिक मागासलेपण तपासण्याची कोणतीही शिफारस केली नव्हती. तसेच ओबीसी प्रवर्गासाठी जातींची यादीही तयार केली नव्हती. नंतर या आयोगाच्या शिफारशींचा आधार घेत राज्य सरकारने १९६५ मध्ये आरक्षणाची टक्केवारी जाहीर केली. मात्र जिल्हानिहाय लोकसंख्येचा मुद्दा लक्षात घेतला नाही. त्यामुळे प्रादेशिक असमतोल निर्माण झाला. तर १९६७ मध्ये राज्य सरकारने योग्य कायदेशीर प्रक्रिया न करताच केवळ जीआर काढून १८० जातींचा ओबीसीमध्ये समावेश केला. सरकारने न त्यांचे सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासले, ना त्यांचे सरकारी सेवांमधील प्रतिनिधित्व तपासले. यानंतर १९६७ पासून २०१४ पर्यंत वेळोवेळी जीआर काढून ओबीसी प्रवर्गातील जाती व पोटजातींची संख्या तब्बल ४५० पर्यंत नेण्यात आली. तसेच आरक्षणाची टक्केवारी १४ वरून ३० टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी, ओबीसी व्हीजेएनटी,एसबीसी असा प्रवर्ग १९९४ च्या जिआर द्वारे एकत्र करण्यात आला. कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब न करता, मनमानी पद्धतीनेच सरकारने हा निर्णय घेतला, असा दावा ॲड व्ही.एम.थोरात व ॲड पूजा थोरात यांच्यामार्फत केलेले याचिकेत करण्यात आला आहे."**

**या याचिकेत कायदेशीर रित्या मी खालील प्रमाणे उत्तर देत आहे व न्यायालयातही सादर करणार आहे.**

वर उल्लेखित जनहित याचिका मध्ये उपस्थित केलेला एकही मुद्दा खरा नसून तथ्यहीन आहे, कारण मागासवर्गीय प्रवर्गासाठी (ओबीसी) राज्यघटनेने घालून दिलेल्या आणि सर्वोच्च न्यायालयाने अनेक निवाड्या मध्ये कायम केलेल्या, कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करूनच अनेक जाती आणि पोट जातींना ओबीसी आणि भटके- विमुक्तांचे आरक्षण दिलेले आहे. संविधानामध्ये कलम १५(४) व १६ (४) नुसार राज्य सरकारांना जे अधिकार प्राप्त झाला आहे, त्यानुसार १९६५ मध्ये हे आरक्षण देण्यात आले. आणि हे आरक्षण देण्यापूर्वी श्री थाडे कमिटी, अंतरोळीकर कमिटी आणि बी.डी.देशमुख यांच्या शिफारशी नुसारच हे आरक्षण दिल्या गेले आहे. १९६७ मध्ये राज्य सरकारने ओबीसींसाठी नेमलेल्या समितीच्या शिफारसीनुसार सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपणा तपासले होते, व त्यांचे सरकारी सेवांमधील प्रतिनिधित्व तपासले, त्यानंतरच ओबीसींना १० टक्के तर भटक्या-विमुक्तांना ४ टक्के, असे एकूण १४ टक्के आरक्षण १९९४ पर्यंत देण्यात आले होते. हे आरक्षण कायदेशीर आणि राज्यघटनेने घालून दिलेल्या कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करूनच दिले होते. त्यामुळे १९९४ पूर्वी दिलेल्या आरक्षणाला घटनाबाह्य ठरविणे चुकीचे ठरेल.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com
मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वि), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458. 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, डरवाहा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१ - टेली - 07232-256333; 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

## आरक्षण, पर्व २ रे :-

१९९३ मध्ये देशांमध्ये मंडल आयोग लागू करण्यात आले, मंडल आयोगाच्या शिफारशी राज्यात लागू करण्याच्या बाबतीत, महाराष्ट्र राज्य अग्रेसर राहिला, देशात सर्वप्रथम महाराष्ट्रात ओबीसींना, केंद्र सरकारने जाहीर केलेले २७ टक्के ओबीसीचे आरक्षण लागू करण्याची कार्यवाही, तत्कालीन मुख्यमंत्री शरदचंद्रजी पवार यांनी केली. १९९४ साली शरद पवार यांनी सर्वपक्षीय नेते, सामाजिक कार्यकर्ते, आरक्षणाचे अभ्यासक, चळवळीचे कार्यकर्ते, विविध समाज संघटनेचे नेते, विविध समाज घटकांचे नेते यांना बोलावून मंत्रालयात एक बैठक बोलावली. मला आठवते, त्या बैठकीला मला आवर्जून बोलविण्यात आले होते, तत्कालीन आमदार, भटके विमुक्तांचे नेते आणि प्रसिद्ध साहित्यिक, लक्ष्मणजी माने यांच्या मार्फत मला निरोप देण्यात आला होता. माझा पोस्टाचा पत्ता तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी,त्यांच्याकडून घेतला, एवढेच नाही लक्ष्मण माने यांना त्यांनी दम भरला होता, " लक्ष्मणराव हरिभाऊ राठोड यांचा पत्ता असेल तरच माझ्या केबिनमध्ये या अन्यथा तुम्हाला प्रवेश नाही "

त्या बैठकीमध्ये मी आवर्जून भटक्या विमुक्तांचा मुद्दा मांडला होता, तो असा की भटक्या-विमुक्तांना महाराष्ट्रात वेगळे आरक्षण आहे, आणि हाच भटका-विमुक्त समाज केंद्र सरकारच्या ओबीसींच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. याचाच अर्थ असा की, भटका-विमुक्त समाज केंद्र सरकारच्या सवलतीसाठी ओबीसी म्हणून गणला जाऊ लागला, आणि महाराष्ट्र राज्यात भटक्या विमुक्त समाजाला त्या काळात वेगळे आरक्षण होते. त्याच वेळेस वंजारी आणि बंजारा असा वाद राज्यात निर्माण झाला होता. तसेच धनगर समाजाला सुद्धा अर्ध भटके म्हणून आरक्षण दिले होते. आणि ते आरक्षण देतांना भटक्या-विमुक्तांना असलेले ४ टक्के वाढवून, ६ टक्के करण्यात आले. याचाच अर्थ असा की, ओबीसींना भटक्या विमुक्तांसह १६ टक्के आरक्षण होते. त्या बैठकीमध्ये मी मागणी केली की, भटके विमुक्त, धनगर आणि वंजारी समाजाला वेगवेगळे आरक्षण द्यावे जेणेकरून सर्व समाज घटकांना योग्य तो सामाजिक न्याय देतायेईल. सर्वांचे विचार घेतल्यानंतर, शरदचंद्रजी पवार साहेबांच्या मंत्रिमंडळाने असा निर्णय घेतला की, विमुक्त 3 टक्के, भटके २.५ टक्के, धनगर ३.५ टक्के, वंजारी २ टक्के आणि ओबीसींना १९ टक्के असे एकूण ३० टक्के आरक्षण देण्यात आले. हे आरक्षण देताना सर्वोच्च न्यायालयाच्या नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठाने ( इंद्रा साहनी प्रकरणी) दिलेली ५० % ची मर्यादा याचा भान ठेवूनच हे आरक्षण देण्यात आले आहे.

वरील परिस्थितीमध्ये अवाजवी आरक्षण आहे आणि, आरक्षणाची टक्केवारी १४ वरून ३० टक्क्या वर नेली, असा दावा करणे चुकीचा आहे.



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (पे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458. 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४०००१. टेली - 07232-256333, 256010

आमदार
विधानपरिषद सदस्य

सत्यमेव जयते

हरिभाऊ राठोड
आमदार (MLC)
माजी खासदार
लोक सभा
मोबाईल: ९९२०७१६९९९
टेली फॅक्स: ०२२ २५६८६६९९

**आरक्षण, पर्व ३ रे :-**

महाराष्ट्र राज्यात १९९४ साली मंडल आयोग लागू करताना, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे घालून दिलेली ५० % ची मर्यादा याचे तंतोतंत पालन, राज्यात करण्यात येत होते, यात कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. परंतु त्यानंतर मात्र दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजी, गोवारी हत्याकांड नागपूर येथे झाले. गोवारी समाजाची अनुसूचित जमातीची आरक्षणाची मागणी होती, आणि केवळ क्लारीकल चुकीमुळे गोवारी आणि गोंड या मधला कॉमा हा उडाल्यामुळे त्यांना आरक्षण देता येत नव्हते. परंतु ११४ गरीब गोवारी समाजाचे बांधव त्या हत्याकांडामध्ये शहीद झाले, आणि या समाजाचे सांत्वन करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाने २ टक्के आरक्षण गोवारी समाजाला, तसेच इतर काही समाजाचा समावेश करून एसबीसी असा प्रवर्ग निर्माण केला गेला. **" सर्वोच्य न्यायालयाच्या इंद्रा साहनी प्रकरणी, न्यायालयाने ५० टक्के आरक्षणाची मर्यादा घातली, त्याच वेळेस सर्वोच्य न्यायालयाने असेही म्हटले आहे कि, एखादी असाधारण परिस्थिती निर्माण झाल्यास ५० टक्याची मर्यादा ओलांडून आरक्षण देता येईल "** हे आरक्षण एका असाधारण परिस्थिती मध्ये देण्यात आलेले आहे, असाधारण परिस्थिती एका अत्यंत दुर्दैवी घटनेमुळे आणि वंचित, दुर्लक्षित अशा समाजासाठी हे आरक्षण दिले गेले आहे. अशा या बिकट प्रसंगी पुरोगामित्व प्राप्त झालेल्या महाराष्ट्राच्या जनतेने ५२% आरक्षणाला कधीही न्यायालयात जाऊन आक्षेप घेतला नाही.

त्यामुळे ५२ टक्के आरक्षण हे सुद्धा घटनाबाह्य आहे असे म्हणता येणार नाही. दुसरे असे कि, मंडल आयोगांनी ओबीसींची लोकसंख्या ५२ टक्के आहे असे, अनुमानित केले होते. तेव्हा याचिकाकर्त्यांनी, ओबीसीची लोकसंख्या केवळ 32 टक्के आहे, असे अनुमान कशावरून काढले, आणि त्याला काय पुरावा आहे ? हे न्यायालयात सादर केलेले नाही. ३२ टक्के हे ओबीसी आहेत, हे जरी आपण खरे मानले तरी, २० टक्के हे भटके विमुक्त आहे. आणि त्यामुळे भटके विमुक्त आणि ओबीसी मिळून, ५२ टक्के होतात. हे मात्र याचिकाकर्ते सोयीस्कर विसरतात. आणि न्यायालयाला खोटी माहिती देवून भ्रमित करीत आहे, हेच स्पष्ट होत आहे. याचा अर्थ असा आहे की, गोरगरीब वंचित समाजाला जेव्हा सामाजिक न्याय द्यायचा असतो, तेव्हा सामाजिक भान ठेवून निर्णय घ्यावे लागतात, हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समितीच्या भाषणा मध्ये ३०/११/१९४८ साली सांगितले आहे. तेव्हा बाळासाहेब सराटे हे स्वतःला मराठा समाजाचे नेते म्हणून मिरवतात व ओबीसी आणि भटक्या-विमुक्तांच्या आरक्षणाला जनहित याचिकेद्वारे आव्हान देतात याला काय म्हणावे ?

**धन्यवाद!**

दि.२३/१२/२०१८

आपला,

हरिभाऊ राठोड

वि.प.स



E-mail : haribhaurathod@gmail.com • Website: www.haribhaurathod.com

मुंबई : ए-२०१, बंजारा हिल, बाबासाहेब नाईक सोसायटी, अशोक नगर पोलीस स्टेशन जवळ, मुलुंड (वे), मुंबई-८० टेली- 25686699 मोबाईल : 09868180458. 09920716999
यवतमाळ : अश्विनी टॉवर, दारव्हा रोड, यवतमाळ, महाराष्ट्र - ४४५००१ - टेली - 07232-256333, 256010